समरी फौजदारी केस क्र. ५५/२०१७
निशाणी क्र.२४

**फिर्यादीचा उलटतपास आरोपीतर्फे वकिल श्री.डिंगणकर यांचेमार्फत शपथेवर सुरु**

०१. मी प्लॅट सन २०१० मध्ये विकत घेतला होता. प्लॅट हा मी माझया नावाने घेतला आहे. मी त्या प्लॅटमध्ये स्वत: रहात होते. माझे घरामध्ये मी, माझे पती,माझा मुलगा व मुलगी असे रहात होतो. माझा मुलगा सिव्हील ड्राफट्समन आहे. मुलगी लॅब टेकनिशियन आहे.

०२. हे म्हणणे खरे आहे की, मी ज्या बिल्डींगमध्ये रहात होते तेथे माझयाप्रमाणे अनेक लोक वास्तव्यास आहेत. हे म्हणणे खरे आहे की, मी सदरील प्लॅट भाडयाने देणेबाबत पेपरमध्ये जाहिरात दिली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीला भाडयाने प्लॅट देत आहे याबाबत लेखी कागदपत्रे केलेली नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीसोबत प्लॅट भाडयाचा व्यवहाराचा करार केलेला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, सदर प्लॅट हा किती वर्षासाठी दयायचा आहे त्याच्या अटी याबाबत लेखी करार केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, जो प्लॅट भाडयाने देणार त्याचे लाईट बील पाच हजार रुपये याबाबत कागदोपत्री ठराव आरोपीशी झालेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्लॅट जो भाडयाने देणार होते त्याबाबत अॅडव्हान्स व महिन्याचे भाडे किती याबाबत लेखी करार आरोपीसोबत केलेला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक ०१/०८/२०१५ रोजी मी आरोपीला प्लॅटचा ताबा दिला व त्याने तो घेतला याबाबत लेखी करार झाला नाही.

०३. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक ३१/०७/२०१६ रोजी आरोपीच्या ताब्यात प्लॅट होता असे दर्शविणारे कागदपत्रे याकामी दाखल केली नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी प्लॅटचे भाडे देत नाही तो प्लॅट फुकट वापरतो म्हणून त्यासंदर्भात त्यास नोटीस दिलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीने प्लॅट फुकट वापरला व नंतर सोडून गेला म्हणून त्यांचेविरुध्द कोणत्याही पोलीस स्टेशनला तक्रार दिलेली नाही.

**आरोपीतर्फे उलटतपासासाठी मुदतीचा अर्ज आला व तो मंजूर झाल्याने उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब.**

श्रवणोत्तर स्विकृत,
सही/—

दिनांक:—१६/०७/२०१८

न्याय दंडाधिकारी प्रथमवर्ग
**सावंतवाडी**